Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# छत्रपती शिवाजी महाराजांचे शेती संबंधी ध्येय आणि धोरणे : एक अभ्यास

**प्रा. रमेश बापूराव जोगदंड**
मत्स्योदरी कला महाविद्यालय,
तीर्थपुरी ता.घनसावंगी जि.जालना.

**प्रस्तावना**

इ.स.1600 वे शतक महाराष्ट्राच्या नव्हेतर संबंध देशाच्या इतिहासात आजरामर ठरले आहे. या शतकाने छत्रपती शिवाजी महारांजाच्या रुपाने एक कल्याणकारी राजा कसा असावा याचे ज्वलंत उदाहरण आपल्या कार्यकतृत्वाने घालून दिले. शिवाजी महाराजाचे निधन होऊन आज तिनशे बेचाळीस इतकी वर्ष झ ाले. तरी आजच्या लोकशाही राज्यात आदर्श करावे असे राज्य त्यांनी निर्माण केले. अपाला देश कृषीप्रधान आहे. 80% समाज शेतीवर उपजिवीका करतो. तसेच या देशाची अर्थव्यवस्था कृषीवर आधारित आहे. असे असतानाही शेतकऱ्यांच्या समस्या कमी होण्याऐवजी त्या वाढतच आहेत. अशावेळी छत्रपती शिवाजी महाराजांनी शेती आणि शेतकऱ्यासंबंधी कोणकोणत्या उपाय योजना केल्या होत्या याची आठवण येते.

**रयतेचा राजा**

स्वराज्यातील सर्व जनता सुखी झाली पाहिजे हे त्यांच्या कार्यभागाचा महत्वाचा भाग होता. सामान्यांना कोणताही त्रास झाला नाही पाहिजे शेतकऱ्यांच्या अडीअडचणी संपल्या पाहिजेत त्यासाठी त्यांनी शेती मध्ये वेगवेगळे प्रयोग केले. ते स्वत:ला रयतेचा राजा म्हणून संबोधित असत त्यामुळेच रयते संबंधी त्यांचे धोरण स्वत:च्या मुलासारखे होते. राज्य हे आपली खाजगी मिळकत नसून जनतेची अमानत आहे. अशा भावनेने शिवाजी महाराज वागत असत. त्यामुळेच स्वराज्यात रयत सुखीसमाधानी होती.

**स्वराज्यातील नापिक जमिनी लागवडीखाली आणल्या** :-

स्वराज्याचा मोठा प्रदेश डोंगराळ सहयाद्रीच्या डोंगर रांगांनी व्यापलेला होता. त्यामुळे त्यांनी हया डोंगराळ भागाला लागवडीखाली आणले. त्यासाठी त्यांनी स्थानिक शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले. जो शेतकरी हया डोंगराळ जमिनी उपजावू करील त्यांना पाच वर्ष सारा माफ केला जात असे. पुढे काही वर्ष फारच थोडा म्हणजे आठवा हिस्सा मग सहावा असे करित पुर्ण आकार घेतला जात होता. स्वराज्याचा मोठाभाग जंगलांनी व्यापलेला होता अशा वेळी झाडे तोडून जमिनीने सपाटीकरन करून खत-माती घालून हि नापिक जमिन लागवडीसाठी आणण्यासाठी त्यांनी उत्तेजन दिले.

**साऱ्याने जमिनी लागवडीस प्रोत्साहन**

आज शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल भावाने विकत घेतल्या जात आहेत. त्या ठिकाणी मोठ-मोठे मॉल, कारखाने टॉवर तयार होत आहेत. अशावेळी छत्रपती शिवाजी महाराजांची शेती संबंधी नितीची आठवण होते. महाराजांनी पडिक जमिनी लागवडीखाली आणल्या या जमिनी कसण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले त्यांना सारा माफ केला. खते-बि-बयाने मोफत दिले.

**संकट काळात शेतकऱ्यांना मदत**

छत्रपती शिवाजी महाराजंचे स्वराज्य हे रयतेचे होते. प्रत्येकाला ते स्वत:चे राज्य वाटायचे महाराजांचे सैन्य ही शेतकऱ्यांच्या मधून निर्माण केलेले होते. या शेतकऱ्याचे त्यांनी स्वराज्य निर्माण केले. म्हणून शेतकऱ्यांच्या पुढे नैसर्गिक किंवा कृत्रिम संकटात ते धाऊन जात असत. ऐवढेच नव्हेतर ती त्यांची शेतकरी कल्याणकारक निती होती त्याकाळी टोळधाड पडे रोगाची साथ येई वारंवार शत्रू सैन्याचे हल्ले होत असत अशा कितीतरी अडचणी शेतकऱ्यापुढे असायच्या अशा वेळी त्यांनी शेतकऱ्यांना आत्मनिर्भय बनविले त्यांच्यात संकटकाळात लढण्याचे बळ निर्माण केले.

**मंदिरे मठ आणि मशिदी यांना जमिनी इनाम दिल्या**

प्राचीन काळापासून मंदिरांना जमिनी दान करण्याची पध्दती होती त्यांचा उद्देश हा की जमिनीच्या उत्पानातून देवस्थानच्या दिवा बत्तीची, उत्सावाची सोय केली जात असे. छत्रपती शिवाजी महारांजानी पडिक जमिनी लागवडी खाली आणून त्यांच्या उत्पानातून स्वराज्यातिल मंदिरांना, मठांना, मशिदीना मदत केली. सध्या आपल्याकडील मंदिरांनाही अशा प्रकारच्या जमिनी दान दिलेल्या आहेत मत्स्योदरी देवी संस्थानाला चारशेएक्कर जमिन आहे. त्यामुळे जे उत्पन्न येईल त्यातून मंदिराचा खर्च भागविला जातो.

**अतिवृष्ठी आणि अवर्षण**

भारतीय शेती निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून आहे. अतिवृष्ठी आणि अवर्षण अशा संकटांना स्वराज्यातील शेतकऱ्यांना नेहमीच सामोरे जावे लागे. अशावेळी स्वराज्यातील रयतेला उपासमारीला सामोरे जावे लागे. यावेळी रयतेवरील सर्व प्रकारचे कर रद्द केले जात असत.

**सरकारकडून शेतकऱ्यांना मदत**

छत्रपती शिवाजी महारांजाचे प्रशासन हे रयतेच्या कल्याणसाठी कार्य किरित होते. शेतकऱ्यांच्या अडीअडचणी सोडवणे हे त्यांचे मुख्य काम होते. शेतकऱ्यांना नांगर दिला जाई मशागतीसाठी बैलाची जोडी आणि पेरणीसाठी बियाने दिले जात असे. महाराजांनी शेती आणि शेतकऱ्याच्या परिस्थित जाणीवपूर्वक प्रयत्न केले. नविन लागवडीखाली आलेल्या जमिनीस सुरुवातीचे चार ते पाच वर्श महसुल कमी असायचा मन मनिल तस मोगली महसुल गोळा करण्याचा पायंडा त्यांनी मोडून काढला.

**सारांश**

छत्रपती शिवाजी महाराज आणि शेतकरी यांचे संबंध अतिशय जिव्हाळयाचे होते. महारांजांनी सोळाव्या शतकात घेतलेले निर्णय हे कित्येक पिंढयांना मार्गदर्शन करणारे होते. आजच्या काळात शेतीही तोटयाच्या व्यवसाय झाला आहे. आज शेती आणि शेतकऱ्याच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यतून बाहेतर पडण्यासाठी शिवकालीन शेतीचा प्रयोग राबीवणे आवश्यक आहे. इतिहास हा येणाऱ्या पिढयांना मार्गदर्शन करण्याचे काम करत असतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी सोळाव्या शतकात शेती, शेतकरी, पर्यावरण, जल व्यवस्थापन वृक्ष संर्वधन या संबंधी ज्या काही उपाय योजना राबविल्या आहेत त्या आजच्या काळातही उपयोगाच्या आहेत हे या शोध निबंधातून दाखवून देण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे.

**संदर्भ** :-

1. वि.गो. खोबरेकर - शिवकाळ - 1630 ते 1707
2. गोविंद पानसरे - शिवाजी कोण होता
3. प्र.ना.देशपांडे - छत्रपती शिवाजी महाराज
4. डॉ.अरुणचंद्र श.पाठक - मध्ययुगीन कालखंड